# शिक्षण सेवक सोसायटीसाठी आज मतदान

## १९ जागांसाठी लढत, ५ हजार २७६ मतदार बजावणार हक्क

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** माध्यमिक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठीच्या शिक्षण सेवक सहकारी सोसायटी निवडणुकीसाठी आज (शनिवारी) मतदान होत आहे. सोसायटीच्या १९ संचालकांसाठी ३८ उमेदवार रिंगणात आहेत. दहा तालुक्यांतील वीस मतदान केंद्रांवर पाच हजार २७६ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. सकाळी आठ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत मतदान होईल. निवडणुकीसाठी १५५ कर्मचारी, पोलीस तैनात केले आहेत. सत्ताधारी पुरोगामी पॅनेल व विरोधी राजर्षी शाहु पॅनेलमध्ये लढत आहे.

मतदानाच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यातील २० केंद्रांवर मतदान होईल. त्यामध्ये सांगली शहरात चार, इस्लामपूर, कवठेमहांकाळ, शिराळा, पलूस, मिरज शहर, जत २, तर खानापूर, आटपाडी आणि उमदी येथे प्रत्येकी एक मतदान केंद्र आहे. मतदान प्रक्रियेसाठी १५५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सोसायटीचे ५ हजार २७६ सभासद आहेत. दोन्ही पॅनेलचे नेते, उमेदवारांनी प्रचारासाठी बैठका आणि विविध विभागांच्या बैठकांवर भर दिला. गेला आठवडाभर आरोप-प्रत्यारोपांनी प्रचार गाजला. सत्ताधारी गटाचे नेतृत्व रविंद्र गवळी, अशोक सकळे, बाळासाहेब मासुले, मुरलीधर निकम तर विरोधी राजर्षी शाहू पॅनेलचे नेतृत्व आर. एस. चोपडे, एन. डी. बिरनाळे, महावीर सौंदत्ते, एस. के. होर्तीकर, आरिफ गोलंदाज आदी करीत आहेत.

## अपघातात एकाचा मृत्यू

**केसरी वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** करवीर तालुका बालिंगा गावाजवळ ट्रॅक्टर ट्रॉली पलटी होऊन चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. सावर्डे दुमाला येथील सुरेश सुभाष जगताप असे मयत चालकाचे नाव आहे. या अपघाताची माहिती मिळताच करवीर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.



सुरेश जगताप

# मिरज येथे २४, २५ रोजी राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन

## कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांची माहिती

**केसरी वृत्तसेवा**

**मिरज :** सतरावे राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन दि.२४ व २५ रोजी मिरज येथे होणार आहे. या संमेलनात सर्व कामगारांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत या संमेलनाबाबत माहिती देताना केले.

बालगंधर्व नाट्य मंदिर, मिरज येथे हे संमेलन होणार असून, शुक्रवार, दि. २४ रोजी सकाळी १० वाजता संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. या दोन दिवसीय संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली असून, महाराष्ट्र विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित या संमेलनाचे उद्घाटक व कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे स्वागताध्यक्ष आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे या संमेलनाचे प्रमुख कार्यवाह आहेत.

संमेलनाच्या पहिल्या सत्रात 'चला उद्योजक होऊ' या विषयावर डॉ. विठ्ठल कामत (कामत हॉटेल्स ग्रुप लि.), गिरीश चितळे (चितळे उद्योगसमूह), हनुमंतराव गायकवाड (भारत विकास ग्रुप इंडिया लि.) या उद्योजकांची मुलाखत होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात 'कामगार चळवळीची कथा आणि व्यथा', 'मराठी साहित्यात कामगार जीवनाचे चित्र शोधताना', 'आम्ही का लिहितो ?', 'व्यसनमुक्तीची लढाई' या विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर कवी संमेलन आणि काव्य मैफिलीचा रसिक प्रेक्षकांना आस्वाद घेता येणार आहे. निमंत्रित तसेच कामगार कवींचा कवी संमेलनात सहभाग असेल. संमेलनात कथाकथनाचे सादरीकरण होणार असून, अभिरूप न्यायालय देखील भरवले जाणार आहे. आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार या अभिरूप न्यायालय कार्यक्रमात सहभागी होणार आहेत, अशी माहिती मंत्री खाडे यांनी दिली.

विभागामार्फत संमेलनासाठी इच्छूक कामगारांची नोंदणी करण्यात येत असून अधिक माहितासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळास अथवा नजीकच्या कामगार कल्याण केंद्रास व कार्यालयास भेट द्यावी.

# अखेर 'ती' चिमुकली बाबांना बिलगली

## अभिजित भोसले यांनी सोशल मीडियावरून शोधले मुलीच्या पालकांना

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** 'ती' चिमुकली वाट चुकली... भीतीने धावत सुटली...धावता धावता रस्ता चुकली आणि रडू लागली... या चिमुरडीचा फोटो नगरसेवक अभिजित भोसले यांनी तत्काळ सोशल मीडियावर पोस्ट केला... अवघा काही तासांतच या चिमुरडीचे बाबा धावत आले... बाबांना पाहताच ही चिमुकली बिलगली... चिमुकलीच्या चेहऱ्यावरचे हसू पाहताच सतत सामाजिक क्षेत्रात व्यग्र असणाऱ्या अभिजित भोसले या लोकप्रतिनिधीच्या चेहऱ्यावरही हास्य उमटले.

सोशल मीडिया काय काम करू शकतो, हे काल दिसून आले. शंभर फुटी रोडवरील सावली बंगल्याजवळ लहान चिमुकली हरवली होती. भीतीने तिथेच भरकटत होती. काही तरुणांनी नगरसेवक भोसले यांच्याशी संपर्क करून या चिमुकलीला त्यांच्या स्वाधीन केले. नगरसेवक भोसले यांनी तत्काळ सोशल मीडियावर पोस्ट टाकली. ही पोस्ट अनेकांनी व्हॉट्स ॲप, फेसबुकवर पोस्ट करून कुणी ओळखीचे असल्यास संपर्क साधावा, असे आवाहनही केले होते. काही तासांतच या चिमुकलीचे नाव शरण्या सिध्दार्थ खाडे असल्याचे समजले. ही पोस्ट सर्वत्र फिरताच सिध्दार्थ खाडे यांनी भोसले यांच्याशी संपर्क साधून ती आपलीच मुलगी असल्याचे सांगितले. काही वेळातच खाडे हे भोसले यांच्या घरी आले. बाबांना पाहताच ती चिमुकली बाबांना बिलगली. हे पाहून सोशल मीडियावर मोहीम राबवल्याचे सार्थक झाल्याचा आनंद नगरसेवक भोसले यांच्या चेहऱ्यावर जाणवला. ती चिमुकली हसत हसत बाबांना बिलगली आणि अवघ्या काही तासांचा सहवास असलेल्या एका सामाजिक कार्यकर्त्यालाही चिमुकलीने स्माईल दिली.



शरण्या खाडे ही बाबांना बिलगली तेव्हा नगरसेवक अभिजित भोसले यांच्याही चेहऱ्यावर हास्य फुलले.

### बाळ सुखरूप घरी पोचल्याचे समाधान

सोशल मीडियाची ताकद खूप असते, हे काल पुन्हा एकदा अनुभवले. हरवलेली ही चिमुकली माझ्या घरी होती, तिच्या वडिलांशी संपर्क झाला. त्यानंतर ते आणि तिची आई आणि आजी येऊन माझ्या घरून तिला घेऊन गेले. बाळ सुखरूप तिच्या घरी पोचली याचे समाधान आहे. या चिमुकलीच्या चेहऱ्यावरचे हास्य पाहून दिवसभराचा शिणवटा दूर झाला. गेल्यावेळीही अशीच एक मुलगी सापडली होती. सोशल मीडियावरील पोस्टमुळे तिलाही सुखरूप पोहोच केली.

**– नगरसेवक अभिजित भोसले**

## चाकूने वार करून खुनाचा प्रयत्न

**मिरज :** शहरातील अहिल्यादेवी होळकर चौक परिसरात एकावर चाकूने वार करून खूनाचा प्रयत्न करण्यात आला. याप्रकरणी फरीद मुख्तार सोलेकी (रा. पाकीजा मस्जिदजवळ, सांगली) यांनी दोन अनोळखी व्यक्तींविरोधात संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दि. ९ रोजी सव्वा बाराच्या सुमारास हा प्रकार घडला. फरशी विक्रीचा व्यवसाय करणारे फरीद हे गुरुवारी अहिल्यादेवी होळकर चौकातील एका रुग्णालयासमोर थांबले होते. त्यावेळी अचानक दोघे तिथे आले आणि त्यांनी फरीद यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यानंतर एकाने चाकू काढून फरीद यांच्या हातावर व दंडावर वार करून त्यांचा खून करण्याचा प्रयत्न केला, असे तक्रारीत म्हटले आहे.

# मायाक्कादेवी यात्रेनिमित्त आज सांगलीवाडीत विविध कार्यक्रम

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** मायाक्कादेवी उत्सव समिती सांगलीवाडी यांच्या वतीने मायाक्कादेवी यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संयोजक मायाक्कादेवी उत्सव समितीच्यावतीने देण्यात आली.

शनिवार, ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता वसंत हंकारे यांचे 'चला जगूया आनंदाने' या विषयावर व्याख्यान होणार आहे. रविवार, १२ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजता महाअभिषेक व दुपारी बारा वाजता महाप्रसाद, दुपारी चार वाजता श्रध्दा भजनी मंडळाचे भजन, रात्री ९ वाजता धनगरी ओव्यांचा कार्यक्रम होणार आहे.

**शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन**

मायाक्कादेवी उत्सव समिती व सांगलीवाडी सोशल ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष गणेश कटगी, उपाध्यक्ष विजय शिंदे, सचिव स्वप्निल सुतार, सक्रेटरी शिरिष करजगी, खजिनदार प्रकाश कोळी यांच्यासह पदाधिकारी व सदस्य कार्यक्रमाचे नियोजन करत आहेत.

Dr. J. J. Magadum Trust's

**Dr. J. J. Magdum Institute of Nursing Education (Code No.09172)**

Shirol – Wadi Road, Jaysingpur, Tal – Shirol, Dist. – Kolhapur
Phone No. 02322 – 226520 Website – www.jjmnursing.com
Admission Notification for AY 2022- 2023

**Basic B.Sc. (Nursing – 4 Year Duration)**

**Application are Invited for Institutional (Against vacant seats After Mop UP Round) & NRI Quota (Management)**

* Candidate must submit application in person at Institute.
* Last Date of application receipt – 15th February, 2023 (Up to 5.00 pm ) & see details schedule on – www.jjmnursing.com
* Eligibility as per State CET cell
* Visit to State CET Cell for vacancy position & more information visit our website
* **Admission call – 7620008242, 9146467610, 8208751240, 8459539696**

Principal Chairman

## दागिने लंपास

**मिरज :** शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसरातून ४४ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास करण्यात आले. याप्रकरणी सुनीता जयंत कुलकर्णी (रा. शितविलास, बसस्थानक रोड, सांगली) यांनी सांगली शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

२९ जानेवारी रोजी हा प्रकार घडला. फिर्यादी यांच्या ओळखीची महिला व तिचा मुलगा सायंकाळच्या सुमारास आले होते. यापैकीच कोणीतरी ही चोरी केल्याची शक्यता कुलकर्णी यांनी व्यक्त केली आहे.

## निधन वार्ता

### अमित लाटवडे



**सांगली :** गावभागयेथील अमित अरविंद लाटवडे (वय ४०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, पत्नी व मुलगा असा परिवार आहे. रक्षाविसर्जन रविवार, दि. १२ रोजी सकाळी ९ वाजता अमरधाम स्मशानभूमी येथे आहे.

### बाबासो पाटील



**तासगाव :** नागाव कवठे (ता.तासगाव) येथील बाबासो शिवाजीपाटील (वय ६५) यांचे हृदयविकारामुळे निधन झाले. ते संत निरंकारी मंडळामध्ये सक्रिय होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ, बहीण असा परिवार आहे. रक्षाविसर्जन शनिवार, दि. ११ रोजी नागाव कवठे येथे सकाळी नऊ वाजता आहे.

**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र. २४७ / मोप्र १, दि. ३०/११/२०२८**

**प्रपत्र- १**

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.**
(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)
**सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली**
**कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली**
ई-मेलपत्ता - eetlmlimd@gmail.com, दुरध्वनी क्र. ०२३३-२३०२६८९

**ई- निविदा सूचना क्र. ५ सन २०२२-२३**

Main Portal: https://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली हे सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचा तपशील-**

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | म्हैसाळ उपसा सिंचन योजना- कवठेमहांकाळ भाग आरग, बेडग उपसा सिंचन योजना व बोरगाव उपसा सिंचन योजना यांच्या सर्वेक्षणाचे काम करणे. | २१.१६ |
| २ | म्हैसाळ उपसा सिंचन योजना- कवठेमहांकाळ भाग. म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत सलगरे वसाहतीसाठी चेनलिंग कंपाऊंडचे काम. | २५.०६ |
| ३ | म्हैसाळ उपसा सिंचन योजना कवठेमहांकाळ भाग. म्हैसाळ उपसा सिंचन योजनेंतर्गत बेळंकी वसाहतीसाठी चेनलिंग कंपाऊंड व गेटचे काम. | २३.७३ |
| ४ | म्हैसाळ उपसा सिंचन योजना- कवठेमहांकाळ भाग. म्हैसाळ पंपगृह टप्पा क्र. १ ते ५ डोंगरवाडी उ. सिं. योजना, गव्हाण उ.सि. योजना, विस्तारीत गव्हाण उ.सिं. योजना, बनेवाडी उ. सिं. योजनांचे पंपगृह, त्यांचे मॅनिफोल्ड व त्यांची उर्ध्वगामी नलिका यांच्या स्वच्छता व देखभाल दुरुस्तीकरिता मजूर पुरवठा करणे. | ३३.४९ |
| ५ | म्हैसाळ उपसा सिंचन योजना- कवठेमहांकाळ भाग. म्हैसाळ पंपगृह टप्पा क्र. ३ च्या संतुलन जलाशयाच्या सांडवा पुच्छ कालव्यावर आर.सी.सी. पाईप मोरी बांधणे. | २७.८० |
| ६ | म्हैसाळ उपसा सिंचन योजना- कवठेमहांकाळ भाग. अंतर्गत कवठेमहांकाळ कालवा सा.क्र. ३६/६७० येथील गव रस्ता पुल बांधणे व सलगरे शाखा कालवा थेट विमोचक सा. क्र. २८/९०० मी. व्हॉल्व चेंबरचे बांधकाम करणे. | ४२.७६ |
| ७ | म्हैसाळ उपसा सिंचन योजना- कवठेमहांकाळ भाग. सलगरे शाखा कालवा येथील पाणीवापर संस्था क्र.५, कवठेमहांकाळ कालवा कि.मी. ४० ते ७३ येथील पाणीवापर संस्था क्र. १ ते ८ ख लिंगनूर पुच्छवितरीका, करोली एम व गवळेवाडी वितरीका येथील पाणीवापर संस्था स्थापन करून हस्तांतरीत करणेचे काम. | २६.७६ |
| ८ | म्हैसाळ उपसा सिंचन योजना. कवठेमहांकाळ भाग- बेडग वितरीका क्र. १ व २ भोसे प्रवाही नलिका, कवठेमहांकाळ कालवा १ ते ३९. बनेवाडी उ. सिं. योजना, विस्तारीत गव्हाण उ. सिं. योजना वितरण व्यवस्थेवर क्रॉस व्हॉल्व बसविणे व विस्तारीत गव्हाण उ. सिं. योजनेच्या उर्ध्वगामी नलिकेवर एअर व्हॉल्व बसविणे. | ७२.७६ |
| ९ | म्हैसाळ उपसा सिंचन योजना- कवठेमहांकाळ भाग- म्हैसाळ पंपगृह टप्पा क्र.१, २ व ३ वरील छताचे नवीन पत्रे बसविण्याचे काम. | १७९.४६ |
| १० | म्हैसाळ उपसा सिंचन योजना- कवठेमहांकाळ भाग- कळंबी शाखा कालवा, सलगरे मुख्य कालवा वितरीक क्र. १, कवठेमहांकाळ कालवा कि.मी. ५६ ते ७३ क्रॉल रेग्युलेटरचे बांधकाम करणे. | १९०,०० |
| | **एकूण** | **६४२.९८** |

**जिल्हा : सांगली**
**निविदेची अंदाजित किंमत रु.६४२.९८ लक्ष**
**ई निविदा उपलब्ध कालावधी- दि.१३/०२/२०२३ ते दि. २७/०२/२०२३**
**ई निविदा उघडणे दिनांक ०१/०३/२०२३ दु. १२.०० वा.**
**स्थळ:- कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली यांचे कार्यालय विश्रामबाग, वारणाली, सांगली ४१६४१५**
**अ) या कामाच्या निविदेसाठी पश्चात अर्हता पद्धती लागू आहे.**
आ) दि.१७/०२/२०२३ ते २१/०२/२०२३ या कालावधीत प्रस्तावित कामाच्या ठिकाणी भेट देऊन इच्छुक कंत्राटदार किंवा त्याच्या प्रतिनिधीने जिओ-टॅगिंग करणे आवश्यक आहे.
इ) खालील ठिकाणी ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळावर https : mahatenders.gov.in
२) कार्यकारी अभियंता, ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली यांचे कार्यालयातील सूचना फलक
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

**सही/- (म. म. रासनकर )**
**कार्यकारी अभियंता,**
**ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली**

**आरओसी-२०२२-२३/क्र.-५/C ५८८०**

**ग्रामपंचायत कार्यालय ढवळी, ता. तासगाव, जि. सांगली**

**जाहीर टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत ढवळी, ता. तासगाव, जि. सांगली यांच्याकडून खालील कामासाठी नोंदणीकृत मक्तेदारकडून B-1 फॉर्ममध्ये खालील शर्ती व अटीस अधीन राहून निविदा मागवणेत येत आहेत.

| अ. नं. | कामांचे नांव | योजनेचे नांव | कामाची अंदाजीत रक्कम | निविदा फॉर्म फी | बयाणा रक्कम | बँकेचे नाव शाखा खाते क्रमांक | निविदा विक्री व स्वीकृतीची दिनांक | काम पूर्ण कालावधी | मक्तेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद शाळा स्लॅब टाकणे | १५ वा वित्त आयोग | १९०७०४ | ३०० | १९०७ | युनियन बँक तासगाव ४७१२०२०१०२५४७१६ | ११।२।२३ ते १६।२।२३ | ६ महिने | पात्र नोंदणीकृत |
| २ | नवीन वसाहत येथे R. C. C. गटर बांधणे | १५ वा वित्त आयोग | १९९७९५ | ३०० | १९९७ | युनियन बँक तासगाव ४७१२०२०१०२५४७१६ | ११।२।२३ ते १६।२।२३ | ६ महिने | पात्र नोंदणीकृत |
| ३ | नदीकाठ व पाणंद रस्ते काटेरी झाडे झुडपे काढणे | १५ वा वित्त आयोग | १६६४६५ | ३०० | १६६४ | युनियन बँक तासगाव ४७१२०२०१०२५४७१६ | ११।२।२३ ते १६।२।२३ | ६ महिने | पात्र नोंदणीकृत |
| ४ | ढवळी गावठाणमध्ये बंदिस्त गटर करणे. | १५ वा वित्त आयोग | ४६०९०९ | ३०० | ४६०९ | युनियन बँक तासगाव ४७१२०२०१०२५४७१६ | ११।२।२३ ते १६।२।२३ | ६ महिने | पात्र नोंदणीकृत |

१) उपरोक्त सर्व कामाच्या निविदा अटी शर्ती इत्यादी बाबतचे तपशील ग्रा.पं. कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) उपरोक्त कामाची बयाणा रक्कम डीडीस्वरुपात/बँकेत जमा केलेची चलन प्रत देणेचे आहे. ३) कोऱ्या निविदा पत्रकाची रक्कम युनियन बँक शाखा ढवळी खाते नं. ४७१२०२०१०२५४७१६ वर भरणा करून चलन सादर करावे. ४) कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे अगर नाकारणे हा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) निविदा स्वीकारण्याची तारीख संपल्यानंतर लगतच्या मासिक सभेत निविदा उघडण्यात येतील. कामाचे बिल उपलब्ध निधी व मुल्यांकन प्राप्तीनंतर अदा केले जाईल.

२) A **लिफाफा क्रमांक-१**

१. जी. एस. टी. नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत २. पॅन कार्ड झेरॉक्स प्रत. ३. वैयक्तिक किंवा नोंदणीकृत संस्था नोंदणी प्रमाणपत्र ४) बयाणा भरणा चलन

३) निविदा प्रसिद्धी दि. ११/०२/२०२३ निविदा स्विकारणे दि. ११/२/२०२३ ते १६/२/२०२३ सकाळी ११ ते सायं. ५ वा. पर्यंत

ठिकाण :- ग्रामपंचायत ढवळी
दिनांक :- १०/०१/२०२३

**सही/- सरपंच/ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत ढवळी, ता. तासगाव, जि.सांगली**

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** कोल्हापूर

L&T Financial Services

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 09.02.2023 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. मीनाक्षी समीर काळे 2. समीर काळे | मालमत्तेचा पत्ताः सी. एस. क्र. 511/ए/3, नॉर्थ पार्ट, डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या समोर, कदमवाडी रोड, कोल्हापूर - 416005 | KOHHL18000297, KOHHL18000296 | 17 जानेवारी 2023 | रु. 7,99,586/- | रु. 1,29,50,830.93/- | रु. 79,95,860/- | 08/03/2023 | 15/03/2023 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **13/03/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **15/03/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **16/03/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या पाहणीसाठी आणि अधिक माहितीसाठी संभाव्य बोलीदार पुढील अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क करू शकतील- **नाव - सुनील निकम, एलअँडटी फायनान्स लि., - ऑफिसः 6वा मजला, ब्रिंदावन बिल्डींग, प्लॉट क्र. 177, कालीना, सीएसटी रोड, मर्सीडीझ शोरुमजवळ, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - 400 098 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242 ऑफिसः 6वा मजला, ब्रिंदावन बिल्डींग, प्लॉट क्र. 177, कालीना, सीएसटी रोड, मर्सीडीझ शोरुमजवळ, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - 400 098.** इ-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी त्यासाठी कोणतेही कारण दिल्याशिवाय आणि कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय बोली/ऑफर स्वीकारू/फेटाळू/बदल करू/रद्द करू शकतील किंवा इ-लिलाव पुढे ढकलू शकतील.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 11.02.2023
**ठिकाण:** कोल्हापूर

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड